

दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# रायगड नगरी

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

गणपती बाप्पा मोरया

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

● वर्ष १७ वे ● अंक १५५ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● रविवार दि.४ सप्टेंबर २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com


# शिल्लक काँग्रेस आम्ही वाटून घेऊ

## एकनाथ शिंदेंसमोर नारायण राणेंचे सूचक विधान

**दै.रायगड नगरी । मुंबई**

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस याचे नवे सरकार स्थापन झाल्यापासून महाविकास आघाडीतील नेते नव्या शिंदे-फडणवीस सरकारवर सातत्याने निशाणा साधताना पाहायला मिळत आहेत. याला शिंदे गट आणि भाजपकडून प्रत्युत्तरही दिले जात आहे. यातच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केंद्रीयमंत्री आणि भाजप नेते नारायण राणे यांच्या निवासस्थानी जावून गणपती बाप्पाचे दर्शन घेतले.**



यावेळी नारायण राणे आणि एकनाथ शिंदे यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. काँग्रेसमधील एका मोठ्या नेत्यासह पक्षातील आमदारांचा एक गट सरकारमधील भाजपत जाणार असल्याच्या चर्चेने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. या मुद्द्यावर बोलताना नारायण राणे यांनी मोठे विधान केले आहे. काँग्रेस छोडो मोहीम भाजपकडून सुरू आहे का? या प्रश्नावर बोलताना राणे म्हणाले, भाजप थेट कृती करते. त्याचबरोबर शिल्लक राहिलेली काँग्रेस वाटून घेऊ, असे नारायण राणे म्हणाले. तसेच एकनाथ शिंदे यांनी घेतलेला एक निर्णय मला आवडला. मागील अडीच वर्ष असलेले सरकार घरी पाठवण्याचा निर्णय त्यांनी घेतला, तो मला खूपच आवडला. त्यामुळे मी त्यांना अभिनंदन करण्यासाठी बोलावले होते, अशी खोचक प्रतिक्रिया नारायण राणे यांनी दिली.

ही सदिच्छा भेट होती. जुन्या आठवणी निघाल्या. मुख्यमंत्री पदाच्या कारकीर्दीतील अनुभवांबद्दल चर्चा झाली, असे एकनाथ शिंदे यांनी सांगितले. काँग्रेसमधील एक गट सरकारमध्ये सामील होणार असल्याची चर्चा सुरू झाल्यासंदर्भात, काँग्रेसबद्दल बोलत नाही. सभागृहात बोललो आहे. त्यांची जी काय फरफट सुरूये, ती आपण पाहतोय. कुणावर टीका करण्याचा माझा स्वभाव नाहीये, असे एकनाथ शिंदे म्हणाले. आम्ही जनतेच्या मनातील भावना जागृत केली. जे अडीच वर्षांपूर्वी व्हायला हवे होते. लोकांच्या मनात जे होते, तो निर्णय आम्ही घेतला.

बाळासाहेबांची भूमिका आम्ही पुढे घेऊन जातोय. काँग्रेसचे नेते सरकारमध्ये येणार असल्याचे मला माहिती नाही, असे एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केले. दरम्यान, याच मुद्द्यावर बोलताना नारायण राणे म्हणाले की, काँग्रेसमधून काँग्रेसवाले म्हणून येत नाहीयेत. ते त्यांच्या शिवसेनेत येत आहेत. ते शिवसैनिक होणार. ते उलट चांगले काम करत आहेत. एक तर ते शिंदे गटाच्या शिवसेनेत जातील नाहीतर भाजपत येतील. जी काँग्रेस शिल्लक राहिलेली आहे, ती आम्ही वाटून घेऊ, असे सूचक विधान नारायण राणे यांनी केले.

## म्हसळा येथे अपघात ; १ ठार



**दै.रायगड नगरी । म्हसळा**

पुणे - दिघी या राष्ट्रीय महामार्गावर महेंद्र पीक-अप ला मोटर सायकलने रॉंग साईडने येऊन पीकअप ला समोरा-समोर ठोकर मारल्याने गंभीर अपघातात मोटर सायकल स्वार डी.व्ही.शशी कुमार वय ३१ रा. म्हसळा, अय्यंगार बेकरी हे जागीच ठार झाले.

माणगाव दिघी या रस्त्यावर साई ता. माणगाव नजिक झाला. याबाबत पिकअपचे चालक नंदकुमार विठ्ठल पवार, वय ५८ रा. समर्थनगर, पनवेल यानी फिर्याद दिल्याने माणगाव पोलीसानी गु.र.नं. २५१ /२०२२ भा.द.वि.कलम ३०४ अ, २७९, ३३५, ३३८, मो.वा.का.क.१८४ प्रमाणे अपघाताची नोंद केली. अपघातात महींद्र पिकअप म्हसळया वरून माणगावकडे जात असता समोरून येणारा मोटर सायकल क्रं. MH06 DK4337 ने भरधाव आणि बेदरकारपणे येऊन पीक अपला रॉंग साईडने जोरदार ठोकरले असतात अपघात म्हसळ्याचा युवक बेकरी व्यवसायिक डी.व्ही.शशीकुमार जागीच ठार झालाअपघाताचे वृत्त आणि तिव्रता कळताच प्रविण पाटील आणि पो.निरीक्षक राजेंद्र पाटील यानी घटनास्थळी तात्काळ भेट दिली.


## महामार्गावर लूटमार करणारे गजाआड

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रात्रीच्या वेळी रस्त्याच्या कडेला मालवाहतूक ट्रक उभा करून झोपलेल्या एका चालकाला लुटणाऱ्या तिघांना गुन्हे पोलिसांनी अटक केली आहे. त्यांच्याकडून चोरीचा ऐवज जप्त केला असून ते सराईत चोरटे आहेत. त्यांनी यापूर्वीही अशाच प्रकारे चोरी केल्याचे समोर आले आहे.

कळंबोली येथे रात्रीच्या वेळी थांबलेल्या या टेम्पोचालकाकडून चोरट्यांनी मोबाइलवरून ९२ हजार स्वतःच्या खात्यात जबरदस्तीने वळते केले व त्याचा मोबाइल घेऊन ते फरार झाले होते. याच गुन्ह्याचा समांतर तपास गुन्हे शाखा करत होती.

दरम्यान, टेम्बोडे पुलाजवळील परिसरात काही इसम चोरीचे मोबाइल विक्रीसाठी येणार असल्याबाबत गोपनीय माहिती गुन्हे शाखा



कक्ष २ पनवेलचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गिरिधर गोरे यांना मिळाली होती. त्यानुसार सापळा रचत आकाश रामजीलाल वाल्मीकी, बाबुसिंग लभाना आणि मुजाहिद अब्दुल कलाम आलम यांना ताब्यात घेण्यात आले. चौकशीत अंगझडती घेतली असता एक मोबाइल व चाकू मिळून आला. हा मोबाइल त्यांनी तक्रारदार टेम्पोचालकाकडून घेत त्यातून ९२ हजार वळते करून घेतल्याचे कबूल केले.

## उरणचे रस्ते बनले सुसाट ; मात्र सर्व्हिस रोड वर अवैध पार्किंग

**दै.रायगड नगरी । उरण**

केंद्रिय मंत्री नितीन गडकरी यांच्या पुढाकाराने आणि जेएनपीए बंदराच्या सहकार्याने उरणच्या वाहतुकीला आता ऐस पैस रस्ते उपलब्ध झाले आहेत. अशा ऐसपैस रस्त्यांवरून आता वाहने सुसाट धावत आहेत. पर्यायाने जनतेच्या वेळेची व पैशांचीही बचत होऊ लागली आहे. मात्र गावा जवळ निर्माण करण्यात आलेल्या सर्व्हिस रोड चा ताबा हा अवजड वाहनांनी अवैध पार्किंग करुन घेण्यासाठी घेतल्याने प्रवाशी नागरीकांना नाहक वाहतूक कोंडीचा व अपघाताचा सामना करावा लागत आहे.तरी अशा अवैध पार्किंगवर आर टी ओ तसेच वाहतूक पोलीस यंत्रणेने तात्काळ कारवाईचा बडगा उगारावा अशी मागणी मनसेचे उरण तालुका अध्यक्ष सत्यवान भगत यांनी केली आहे.



उरण हा आकारमानाने लहान तालुका असला तरी जे एन पी ए व अन्य बंदरांमुळे या तालुक्यात मोठे औद्योगीकरण होत आहे. त्यामुळे उरणच्या प्रवासी वाहतुकीच्या रस्त्यांवरूनच अवजड वाहनांची वाहतूक मोठ्या प्रमाणत होत होती.त्यामुळे रस्तो रस्ती वाहतूक कोंडी ही नेहमीची समस्या झाली होती. जे एन पी ए व अन्य बंदरात तसेच मालाची साठवणूक करणाऱ्या गोदामांमध्ये येणारी वाहने वाहतूक कोंडीत तासनतास अडकून पडत असत.त्याच बरोबर रस्त्यावरून प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांनाही वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत असे, त्यामुळे वेळ व इंधनाच्या खर्चात वाढ होत होती.त्यातच बेशिस्त वाहनांमुळे जवळ जवळ सुमारे ९८७ निष्पाप प्रवाशी नागरीकांना आपले प्राण गमवावे लागले.

.../२

## संक्षिप्त...

### महापालिका निवडणुकीत शिवसेनेचेच वर्चस्व कायम राहणार : किशोरी पेडणेकर

**दै.रायगड नगरी । मुंबई**

मुंबईसह अनेक महानगरपालिका आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आगामी काळात होणार आहेत. मात्र, मुंबई, ठाणे महानगरपालिकांच्या निवडणुकीकडे अवघ्या राज्याचे लक्ष लागले आहे. एकनाथ शिंदेंनी बंडखोरी केल्यानंतर मुंबई महापालिकेची निवडणूक शिवसेनेला चांगलीच आव्हानात्मक ठरू शकेल, असे सांगितले जात आहे. गत निवडणुकीचा वचपा काढण्यासाठी भाजप उत्सुक असल्याने शिंदे गट आणि भाजप शिवसेनेला चितपट करण्यासाठी रणनीति आखत असल्याचे बोलले जात आहे. यातच आगामी मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत शिवसेनेचेच वर्चस्व कायम राहील. इतकेच नाही, तर शिवसेना १५० जागांवर बाजी मारेल, असा दावा करण्यात आला आहे.

शिवसेना नेत्या किशोरी पेडणेकर यांनी याबाबत दावा केला आहे. गेल्या २५ वर्षापासून मुंबई महापालिकेवर शिवसेनेचे वर्चस्व आहे. मात्र, हेच मोडीत काढण्यासाठी आता भाजपकडून सर्वतोपरी तयारी केली जात आहे. आगामी दोन दिवस गृहमंत्री अमित शाह मुंबईत दाखल होत आहेत. असे असले तरी महापालिकेवर भगवाच कायम राहणार. यंदाच्या निवडणुकांमध्ये शिवसेनेच्या जागांमध्ये वाढ होऊन हा आकडा १५० असेल, असे किशोरी पेडणेकर यांनी म्हटले आहे.



सिडकोचे मुख्य अग्नीशमन अधिकारी विजय राणे यांनी पोतदार कुटुंबियांच्या निवासस्थानी विराजमान झालेल्या श्री गणरायचे दर्शन घेतले


### शरद पवार ठाकरेंच्या मदतीला सरसावले?

## शिवसेनेच्या दसरा मेळाव्यावरून एकनाथ शिंदेंना सुनावले

**दै.रायगड नगरी । मुंबई**

गेल्या अनेक दिवसांपासून शिवतीर्थावर होणाऱ्या शिवसेनेच्या दसरा मेळाव्यावरून अनेक तर्क-वितर्क लढवले जात आहे. एकनाथ शिंदेंनी बंडखोरी केल्यानंतर मोठे भगदाड शिवसेनेला पडले आहे. मात्र, आम्हीच शिवसेना असल्याचा दावा शिंदे गटाकडून केला जात आहे. यातच शिवाजी पार्कवर होणारा शिवसेनेचा दसरा मेळावा शिंदे गट हायजॅक करण्याच्या प्रयत्नात असल्याच्या चर्चा सुरू आहे. शिवतीर्थावरील दसरा मेळाव्याच्या वादात मनसेने उडी घेतल्यानंतर आता राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा शरद पवार हे शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या मदतीला सरसावले आहेत. तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना सूचक सल्लाही दिला आहे.

प्रसारमाध्यमांशी बोलताना शरद पवार म्हणाले की, मेळावा घेण्याचा अधिकार सर्वांनाच आहे. पण वाद टाळले



गेले पाहिजेत. मुख्यमंत्री राज्याचे असतात. ते एका पक्षाचे नसतात. त्यामुळे त्यांनी सर्वसमावेशक भूमिका घ्यावी. सामोपचाराने त्यांनी वाद सोडवला पाहिजे, असे शरद पवार यांनी म्हटले आहे.

राज्याचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनीही शिंदे गट आणि शिवसेनेला शिवाजी पार्क

.../२

## पनवेलमध्ये तरुणाची ऑनलाईन फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

अनोळखी इसमाने एका तरुणाला फोन द्वारे संपर्क करून तो जिओ कंपनीकडून बोलत असल्याचे सांगून तुमचे जिओ कंपनीचे सिमकार्ड एक्सपायर झाले असून तुम्हाला रिचार्ज करायला लागेल असे सांगून त्या मुलाकडे केवायसी मागून जवळपास २० हजार ९६७ नेटबँकिंग द्वारे ट्रान्सफर करून त्या तरुणाची फसवणूक केल्याची घटना पनवेल शहरात घडली आहे.

शहरात एका १८ वर्षीय तरुणाला अनोळखी इसमाने फोन द्वारे संपर्क करून तो जिओ कंपनीकडून बोलत असल्याचे सांगितले. तसेच तुमचे जिओ कंपनीचे सिमकार्ड एक्सपायर झाले असून तुम्हाला रिचार्ज करायला लागेल असे सांगितले. त्या मुलाकडे केवायसी मागून जवळपास २० हजार ९६७ नेटबँकिंग द्वारे ट्रान्सफर करून त्या तरुणाची फसवणूक केल्याची घटना पनवेल शहरात घडली आहे. यासंदर्भात पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. दरम्यान गेल्या काही दिवसापासून ऑनलाईन फसवणुकीमध्ये वाढ झाल्याचे दिसून येत आहे.

## अंबा नदीवरील पुलांचे काम रखडले ; प्रवाशांचा जीवघेणा प्रवास



**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

पाली खोपोली राज्य महामार्गावरील पाली, भालगुल व जांभुळपाडा या नवीन पुलाचे काम पावसाळ्यापूर्वी पूर्ण होणार, व प्रवाशी व वाहनचालकांचा प्रवास सुखकर होणार अशी आश्वासने एम एस आर डी सी व लोकप्रतिनिधिंनी छातीठोकपणे आश्वासने दिली होती. मात्र ही आश्वासने पाण्यात विरघळली आहेत. आजही येथील धोकादायक पुलांवरून वाहतूक होतेय, विशेष म्हणजे पाली आंबा नदी पुलावरून यंदाही पाणी गेलेय, त्यामुळे तासन तास इथली वाहतूक खोळंबली. नवीन पुलाचे काम कधी पूर्ण होणार, जनतेचा हा त्रास कधी थांबणार असा सवाल संतप्त जनतेतुन विचारला जातोय. सावित्री पूल दुर्घटनेनंतर राज्यातील अनेक जुन्या व धोकादायक पुलांचा प्रश्न ऐरणीवर आला. यावेळी वाकण पाली खोपोली राज्य महामार्गावरील वाहतूक व प्रवासाच्या दृष्टीने महत्वपूर्ण असलेल्या पुलांना अधिक मजबूत व क्षमतेचे करण्याच्या दृष्टीने पावले उचलली गेली. या महामार्गाच्या रुंदीकरणाचे काम मागील ५ वर्षांपासून संथ गतीने सुरू आहे. या मार्गावर पाली, भालगुल व जांभूळपाडा येथील अंबा नदी वरील नवीन पुलांचे काम काही महिन्यांपासून रखडले आहे. परिणामी जुन्या धोकादायक पुलांवरून सध्या वाहतूक सुरू आहे. पूल कधी पूर्ण होणार याची सर्वांना प्रतीक्षा लागली आहे. याबरोबर पावसाळ्यात पुलांवरून पाणी गेल्याने वाहतूक देखील खोळंबते. यामुळे प्रवासी, चाकरमानी व वाहन चालकांची खूप गैरसोय होत आहे. पाली खोपोली मार्ग सुस्थितीत यावा, येथील पूल नव्याने बांधण्यात यावेत यासाठी वारंवार आंदोलने केली गेली, पण प्रशासनाकडून कोणतीही जलद कार्यवाही नाही .

या ठिकाणी तब्बल २५ कोटीच्या निधीतून अधिक क्षमता, रुंदी आणि उंचीचे पूल तयार होत आहेत. या तिन्ही ठिकाणचे एका बाजूचे पूल जून महिन्यात पूर्ण होऊन तेथून वाहतूक सुरू होणे अपेक्षित होते. मात्र कामगार उपलब्ध नसणे, ठेकेदाराचे दुर्लक्ष अशा अनेक कारणांमुळे पुलांचे काम मागील अनेक महिन्यांपासून जैसे थे आहे. वाकण -पाली- खोपोली राज्य महामार्ग पुणे-मुंबई वरून खोपोलीमार्गे कोकणाकडे जाण्यासाठी वाहतूक व प्रवासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. हा मार्ग मुंबई-गोवा महामार्गाला पर्याय मानला जातो. तसेच मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग व मुंबई-गोवा महामार्गाला जोडतो. त्याच बरोबर येथून विळे मार्गे पुणे आणि माणगावला ही जाता येते. त्यामुळे मुंबई पुणे तसेच कोकणासाठी हा मार्ग महत्त्वाचा

.../२

# जीवन प्राधिकरणाची कामे सुनियोजित पध्दतीने करावीत ; जनार्दन पार्टे

**दै.रायगड नगरी । माथेरान**



काही वर्षांपासून माथेरान मध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची कामे जोरात सुरू आहेत परंतु ही कामे करताना कुठल्याही प्रकारचे नियोजन नसल्याने आणि ज्या ज्या ठिकाणी पाईप लाईनची कामे करताना रस्त्याची खोदाई केली जात आहे ते रस्ते पूर्ववत केले जात नाहीत. त्यामुळे सर्वत्र रस्त्यांची मोठ्या प्रमाणावर वाताहत झालेली आहे. गावातील संपूर्ण रस्ते नगरपरिषदेच्या अखत्यारीत येत असताना नगरपरिषदेच्या अधिकारी वर्गाने याकडे डोळेझाक केल्यामुळे संबंधित ठेकेदाराने सर्वच कामात चालढकल सुरू केली आहे. यावर संबंधित खात्याचा अंकुश नसल्याने कामे अद्यापही पूर्ण झालेली नाहीत त्यामुळे रस्त्यावरून चालताना नागरिकांना, पर्यटकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. यासाठी येथील सामाजिक कार्यकर्ते माथेरान पाणी पुरवठा व सनियंत्रण एक सदस्य समिती प्रमुख माथेरानचे जनार्दन शंकर पारटे यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालयाकडे निवेदनाद्वारे केलेली आहे.

माथेरान शहर सुधारित पाणी पुरवठा योजने साठी २५ कोटी रुपये मंजूर करून कामाला सुरवात केली होती. या सुधारित पाणी योजने साठी आत्ता पर्यटन ४० कोटी पेक्षा जास्त रुपये खर्च झाले आहेत. तरी देखिल या सुधारित पाणी योजनेची कामे अजून पूर्ण झाली नाहीत. माथेरान मध्ये सर्व विभागात सुधारित नवीन पाईप लाईन टाकताना ती कोठेही सरळ रेशेत न टाकता ती वर खाली झीक झ्याक अशा प्रकारे टाकली आहे. आणि ही लाईन टाकताना कोठेही वॉश आउट वॉल लावण्यात आले नाहीत.त्यामुळे या लाईन मध्ये कचरा अडकून चोकप झाल्यास तो दोष कोठे आहे हे कळत नाही त्यामुळे हा दोष शोधण्यासाठी अनेक ठिकाणी रस्ते खोदुन कोठपर्यंत पाणी पास होते ते पहिले जात आहे.

तेंव्हा या मेन लाईन वर आणि सर्व विभागातील ब्रेचेस लाईन वर वाश आउट गेट वॉल बसविण्यात यावेत यासाठी पार्टे यांनी ही रास्त मागणी केली तेंव्हा संबंधीत ठेकेदार यांनी असे सांगितले की वॉश आउट टाकण्यात यावेत असे आमच्या ठेक्यामध्ये नमूद केलेले नाही. तेंव्हा त्यांनी म. जी. प्राधिकरणच्या कर्जत पनवेल येथील वरिष्ठ अभियंते यांच्याशी भेटून त्यांच्या ही बाब लक्षात आणून दिली तेंव्हा त्यांनी या तक्रारीची दखल घेतली व गावातील लहान ३/४ इंची ब्रेचेस लाईन वर वॉश आउट वॉल बसविले. परंतु ८ इंची ६ इंची मेन लाईन वर कोठेही वॉश आउट वॉल बसविण्यात आले नाहीत ते बसविण्यात यावेत अशी रास्त मागणी माथेरान पाणी पुरवठा व सनियंत्रण एक सदस्य समिती प्रमुख माथेरानचे जनार्दन शंकर पारटे यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालयाकडे निवेदनाद्वारे केलेली आहे.

# गणेशोत्सवात रोजच्या जीवनातील लागणारे घरगुती साहित्य वाटप

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत तालुक्यातील आदिवासी वाडीमध्ये गणेशोत्सवाच्या निमित्त रोजच्या जीवनातील लागणारे घरगुती साहित्य वाटप करण्यात आले.

शिवस्वराज्य बहुउद्देशीय सामाजिक संस्था जिते तसेच गुंज फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने, गुंज फाउंडेशनचे आनंद खरे यांच्या सहकार्याने तसेच ड. रंजना धुळे व हर्षद (सोनु) भोपतराव यांच्या मार्गदर्शनाखाली गणेशोत्सव निमित्त जिते व कुंभे आदिवासी वाडीमध्ये रोजच्या जीवनात लागणारे घरगुती साहित्य वाटप करण्यात आले, तर मारुती भोसले यांना व्हेल चैर देण्यात आली, याप्रसंगी जिते ग्रामपंचायत विद्यमान सदस्या वंदना हजारे,माजी उपसभापती काशिनाथ मिरकुटे, शिवस्वराज्य संस्थेचे अध्यक्ष अक्षय जाधव, शिवस्वराज्य संस्थेचे सचिव विकास शेळके, चंद्रकांत हजारे, किरण जाधव,शिवस्वराज्य संस्थेचे खजिनदार निलेश घरत, मयुर जाधव, आकाश शेळके, रोहित हजारे, नामदेव मुकणे, वामन वाघमारे, पिंट्या मुकणे, हरिश्चंद्र मिरकुटे,मंगल मिरकुटे, दशरथ मिरकुटे,काळुराम मिरकुटे ,मोहित जाधव, सुदेश हजारे,सुमीत जाधव,रोनित जाधव, रितेश दाभणे, हर्षद जाधव, कुणाल जाधव,शिवम जाधव,मंथन शेळके आदी मान्यवर उपस्थित होते.



# हजारो विद्यार्थी बार्टीच्या प्रशिक्षणासाठी निवड परीक्षेच्या निकालाच्या प्रतीक्षेत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागाच्या पुणे येथील बार्टी या संस्थे मार्फत राज्यातील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्याकरिता विविध प्रशिक्षण कार्यक्रम राबविले जातात. याकरिता राज्यभरात हजारो विद्यार्थी प्रशिक्षणाला अर्ज करतात. बँक, रेल्वे, एलआयसी इत्यादी क्षेत्रात तसेच कॉर्पोरेट आणि खाजगी क्षेत्रातील नोकऱ्यांच्या परीक्षांच्या तयारीकरिता हे प्रशिक्षण कार्यक्रम राबविले जातात. विद्यार्थी निवड परीक्षा लोटून माहिना निघून गेला, तसेच प्रशिक्षण सुरु होण्याची तारीख लोटून १५ दिवस निघून गेले. परंतु या परीक्षेचे बार्टीने निकाल न लावल्याने प्रशिक्षणास विद्यार्थी अद्याप रुजू होऊ शकले नाही.

३१ जुलै २०२२ ला राज्यभर बार्टी पुणे यांनी प्रशिक्षणासाठी चाळणी परीक्षा घेतली. याचा निकाल लावून प्रशिक्षण १७ ऑगस्ट २०२२ ला सुरु होणार अशी माहिती देखील बार्टीतर्फे प्रसिद्ध करण्यात आलेली होती. त्यानुसार राज्यात ३० प्रशिक्षण केंद्रांवर २३ हजार विद्यार्थ्यांनी अर्ज केले आहेत. परंतु अद्याप या परीक्षेचा निकाल लागलेला नाही. अनेक वर्षापासून हा प्रशिक्षण कार्यक्रम सुरु आहे. या आधीच्या काळात साधारणतः परीक्षेच्या नंतर ७ दिवसाच्या आत निकाल लावून जाहीर वेळेत आणि तारखांमध्ये प्रशिक्षण सुरु होण्याचा प्रघात होता. मात्र सध्या बार्टीच्या प्रशासनामध्ये हजारो विद्यार्थ्यांना फक्त वेठीस धरण्याचा प्रकार घडून येत असल्याचे या निमित्ताने समोर आले आहे.

हे प्रशिक्षण कार्यक्रम नियमित आणि कालबद्ध पद्धतीने चालावे याकरिता महाराष्ट्र शासनाने शासन निर्णयात प्रत्येक वर्षाचे वार्षिक नियोजन आखून दिलेले आहे. त्या शासन निर्णयामध्ये मे –२०२२ मध्ये हे प्रशिक्षण सुरु करण्याचे आदेश आहेत. परंतु बार्टीच्या अधिकाऱ्यांनी सप्टेंबर सुरु होऊन देखील परीक्षेचा निकाल अद्याप लावला नाही आणि २३ हजार विद्यार्थ्यांना ताटकळत ठेवले आहे.

देशामध्ये विविध बँकिंग, एलआयसी इत्यादी क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर भरती सुरु आहे आणि त्याच्या परीक्षांच्या तारखा देखील जाहीर झालेल्या आहेत. परंतु बार्टी येथील अधिकारी अनुसूचित जातीच्या हजारो विद्यार्थ्यांच्या प्रशिक्षणाबाबत अत्यंत निष्काळजीपणा करीत आहेत.

यासंबंधीत शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्याचे सोडून प्रशिक्षणाचे वार्षिक नियोजन अक्षरशः पायदळी तुडविताना त्यांना त्यांच्या जवाबदाऱ्यांचे भान राहिलेले नाही.

# भाजपा दक्षिण रायगड संघटना मजबूत करणार : कृष्णा कोबनाक

**दै.रायगड नगरी । म्हसळा**



रायगड जिल्ह्यातील असंख्य कार्यकर्ते मुंबई उपनगर, वसई, विरार, नालासोपारा, डोंबिवली, कल्याण, नवी मुंबई मध्ये मागील १५ ते २० वर्षे कालावधीत मोठ्या प्रमाणात स्थलांतरित झाले आहेत या सर्वांना भारतीय जनता पार्टी– कोकण विकास आघाडी, मुंबई च्या माध्यमातून कृष्णा कोबनाक यांच्या नेतृत्वाखाली तालुकानिहाय जबाबदारी देण्यात आली. त्याच अनुषंगाने मुंबई दादर येथील भाजपा कार्यालयाचे हॉल मध्ये मुंबई भाजपाचेअध्यक्ष आमदार आशिष शेलार यांच्या मार्गदर्शनाखाली व कोकण विकास आघाडी अध्यक्ष सुहास अडविरेकर यांच्या माध्यमातून सर्व पदाधिकारी यांची तालुका निहाय नेमणूक करण्यात आली आहे.

सह संपर्क प्रमुख रायगड साठी मदन केशव वाजे, गोविंद भायदे, जिल्हा सह संपर्क प्रमुख महिला रायगड सौ शुभांगी सुर्वे, तालुका संपर्क प्रमुख रघुनाथ भायदे, म्हसळा, संतोष साबळे, श्रीवर्धन, सुरेश लांबे, मुरुड, संदीप रेवाले, रोहा, विनोद मानकर, तळा, संतोष फिलसे, महाड, राजेंद्र केळुसकर – कर्जत तालुका सह संपर्क प्रमुख निलेश गिजे – म्हसळा, हेमंत रामाणे, म्हसळा, कृष्णा भोंबडे, श्रीवर्धन, कृष्णा किंजळे, मुरुड, भालचंद्र पवार, रोहा, प्रदीप साळवी, महाड. यांच्या नेमणूका आगामी सर्व लोकसभा, विधानसभा, महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती करिता मुंबई निवासी बांधवांना एकत्रित करुन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्वप्नातील भारत, तरुण तडफदार दूरदृष्टी नेतृत्व देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून महाराष्ट्र घडविण्या साठी, रायगड जिल्ह्यातील विकास कामे, बेरोजगारी, वहातूक समस्या सोडविण्यासाठी घरा घरात, गावा गावात भारतीय जनता पार्टीचे विचार पोहचविणे, शेवटच्या व्यक्तीचा विकास हाच भाजपचा ध्यास आहे हे ५ट कमया मोहीमेत सामील व्हा असे आवाहन करणे असे नियोजन रायगड जिल्हा संपर्क प्रमुख कृष्णा कोबनाक यांनी केले आहे. या कार्यक्रमाला भाजपा कोकण विकास आघाडी, मुंबई अध्यक्ष सुहास आडिवरेकर सरचिटणीस संजय सुर्वे, राजाराम मोरे, नितिन गावकर, महीला अध्यक्षा सौ. रसिका आनेराव व अन्य प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

# खारघरमध्ये सायकल चोरीचे प्रमाण वाढले

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघर परिसरात सायकल चोरीचे प्रमाण वाढले आहे. सायकल चोर सोसायटीत वॉचमन नसल्याचा फायदा घेऊन सोसायटीच्या आव–ारात प्रवेश करतो व काही काळ थांबून तेथील सायकल हेरतो व त्या सायकलवर बसून तेथून पळ काढतो.

खारघर सेक्टर ३४, फॉर्च्यून स्प्रिंग या बिल्डिंगमध्ये सायकल चोरी करताना चोर सीसीटीव्हीत कैद झाला आहे. सायकल चोरी करणारा गुन्हेगार हा सराईत गुन्हेगार असून याचे नाव रामबाबू असल्याचे समोर आले आहे. रामबाबू हा सराईत गुन्हेगार असून काही दिवसांपूर्वी त्याला अटक करण्यात आली होती. मात्र तो पुन्हा बाहेर आला आहे. रामबाबू आजही तशाच प्रकारचे वारंवार गुन्हे करत आहे. याबाबत भानुप्रताप सिंग फॉर्च्यून स्प्रिंग बिल्डिंगचे सेक्रेटरी यांनी खारघर पोलीस ठाण्यात तक्रार केली असून आरोपीला तात्काळ अटक करून कारवाई करण्याची मागणी केली आहे.

# अतुल चव्हाण यांची मनसेच्या जिल्हा सचिवपदी निवड

**दै.रायगड नगरी । पनवेल**



पनवेल येथील अतुल चव्हाण यांची मनसेच्या जिल्हा सचिवपदी निवड करण्यात आली आहे.मनसे नेते अनिल शिदोरे यांच्या मार्गदर्शनाखाली, मनसे नेते बाबू वागस्कर, पक्षाचे सरचिटणीस तथा मावळ लोकसभा निरीक्षक हेमंत संभुस व किशोर शिंदे यांच्या उपस्थितीत आणि उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष संदेश ठाकूर यांच्या शिफारशीने अतुल चव्हाण यांची जिल्हा सचिव (निवडणुक) व अविनाश पडवळ यांची जिल्हा सचिव (प्रचार व प्रसार) पदी नियुक्ती करण्यात आली.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## उरणचे रस्ते बनले सुसाट ; मात्र सर्व्हिस रोड वर अवैध पार्किंग

या समस्य संदर्भात उरणकरानी वारंवार आंदोलने उभारुन आवाज उठविला होता. या आंदोलनाची दखल केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी घेऊन तोडगा काढण्यासाठी जे एन पी ए महामार्गाचे आठ पदरी काँक्रीटकरण व रुंदीकरण करण्याचे व गावा जवळ सर्व्हिस रोड निर्माण करण्याचे काम राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या माध्यमातून हाती घेण्यात आले. यासाठी सुमारे तीन हजार कोटीचा खर्च करण्यात आला असून अशा दर्जेदार रस्त्यांचे भूमिपूजनांचे काम देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पार पडला होता.

एकंदरीत वाहतूक कोंडी होणाऱ्या ठिकाणी उड्डाण पुलांची निर्मिती तसेच गावा जवळ सर्व्हिस रस्त्याची निर्मिती केली आहे. त्यामुळे उरण मध्ये येणारी वाहने आता ऐसपैस रस्त्यामुळे सुसाट येत आहेत. पूर्वी उरण वरून नवी मुंबई,पनवेल येथे जाण्यासाठी तास दीड तास लागायचा मात्र आता तेच अंतर अवघ्या वीस मिनिटात कापता येवू लागल्याने वेळ, इंधन व पैशांची मोठ्या प्रमाणात बचत होऊ लागली आहे. एकंदरीत दर्जेदार वेगवान मार्गांमुळे उरणच्या विकासाला गती मिळणार आहे.मात्र उरणचे रस्ते प्रशस्त व सुसाट झाले असले तरी जनतेसाठी, प्रवाशी नागरीकांसाठी आवश्यक असणाऱ्या सर्व्हिस रस्त्यांचा ताबा हा सध्या अवजड वाहनांनी पार्किंगसाठी घेतल्यांचे चित्र दिसून येत आहे.त्यामुळे सुरक्षित वाटणारे ऐसपैस रस्ते, सर्व्हिस रस्त्य सध्या धोकादायक वाटत आहेत.

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विभागाचे प्रमुख अधिकारी, जेएनपीए बंदरातील अधिकारी, आर.टी.ओ विभागाचे अधिकारी आणि वाहतूक पोलीस यंत्रणेचे वरिष्ठ अधिकारी यांनी प्रत्यक्षात जेएनपीएने निर्माण केलेल्या ऐसपैस रस्त्याची व गावा जवळील सर्व्हिस रस्त्याची पाहणी करून वाहतूक कोंडीला तसेच अपघाताला कारणीभूत ठरणाऱ्या अवैध पार्किंगवर कारवाईचा बडगा उगारावा न पेक्षा या विरोधात जन आंदोलन उभारण्यात येईल असा इशारा मनसेचे उरण तालुका अध्यक्ष सत्यवान भगत यांनी दिला आहे.

## शिवसेनेच्या दसरा मेळाव्यावरुन एकनाथ शिंदेंना सुनावले

मैदानावरून वाद न घालण्याचे आाहन केले आहे. शिवाजी पार्क मैदानावर शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्या स्थापनेपासून मेळावे घेत आले आहेत. त्यांच्यानंतर उद्धव ठाकरे हे शिवाजी पार्क मैदानावर मेळावे घेत आहेत. उद्धव ठाकरे हेच शिवसेनेचे नेतृत्व करतील असे बाळासाहेबांनी सांगितले होते. त्यामुळे शिवाजी पार्क मैदानावरून वाद घालू नये, असे अजित पवार म्हणाले. ज्यांच्या हातात पॉवर आहे ते पाहिजे तशा गोष्टी करतात. आधी एकाचा आणि नंतर दुसऱ्याचा कार्यक्रम होईल. वाद घालू नका. शिवाजी पार्क मैदानावरील सभा झाल्यानंतरच जनता कोणाच्या पाठीशी आहे हे कळेल, असा टोलाही अजित पवारांनी लगावला.

दरम्यान, भाजपने शिवसेनेचा गड असलेल्या वरळीतील जांबोरी मैदानावर आपला दहीहंडी उत्सव दणक्यात साजरा केल्यानंतर आता शिवसेनेला चितपट करण्यासाठी शिंदे गट सरसावल्याचे सांगितले जात आहे. शिवसेनेची शान असलेल्या दसरा मेळाव्यात खोडा घालण्यासाठी प्रयत्न केले जात असल्याचे सांगितले जात आहे.

## अंबा नदीवरील पुलांचे काम रखडले ; प्रवाशांचा जीवघेणा प्रवास

आहे. परिणामी हे तिन्ही पूल लवकर पूर्ण होणे आवश्यक आहे. हे तिन्ही पूल कमकुवत होऊन वाहतुकीसाठी असुरक्षित झाले आहेत. पावसाळ्यात तर पुलांवरून पाणी गेल्यामुळे प्रवासी व विद्यार्थ्यांची खूप गैरसोय होत आहे. त्यामुळे वेळीच नवीन पुलाची निर्मिती होणे गरजेचे होते. हे नवीन होणारे पूल दर्जेदार व लवकर पूर्ण झाले पाहिजेत. मात्र या पुलाचे काम अद्याप रखडल्याने संताप व्यक्त होतोय.

पाली, जांभुळपाडा व भालगुल येथील पुलांची केवळ एकोणीस टन वजन भार पेलण्याची क्षमता आहे. मात्र या पुलांवरुन साठ टनाची वाहतुक होत आहे. त्यामुळे हे पुल दिवसेंदिवस कमकूवत व धोकादायक होत आहेत. दरवर्षी प्रमाणे या वर्षी देखील पावसाळ्यात येथील पाली अंबा नदी पुलावरून पाणी गेले. यामुळे दोन्ही बाजूची वाहतूक खोळंबली. तसेच पुलावरील सिमेंटचे व लोखंडी संरक्षक कठडे (रेलिंग) वाहून गेले आहेत. रस्त्यावर खड्डे पडले आहेत. याबरोबरच क्षमतेपेक्षा अधिक वजनाचे वाहने जाणे, पुलावरील खड्डे यामुळे हे पूल वाहतुकीसाठी असुरक्षित झाले आहेत. नवीन पुलामुळे येथून प्रवास करणे सुरक्षित व सुलभ होणार आहे. मात्र हे काम रेंगाळले असल्याने नागरिक व प्रवासी संतप्त झाले आहेत. वाकण पाली खोपोली राज्य महामार्गावरील पाली येथील अंबा नदी पुल मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गाला जोडतो. तसेच दक्षिण कोकणातून पुणे व मुंबईला मुंबई–पुणे द्रुतगतीमार्गाने जाणारे प्रवाशी, वाहने व मालवाहू वाहने याच मार्गावरून जातात. येथून मोठ्या प्रमाणात प्रवासी व अवजड वाहनांची वाहतुक होते. मात्र या पुलावर ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत. पावसाळ्या आधीच या पुलाच्या मध्यावरील काही लोखंडी संरक्षक कठडे (रेलिंग) तुटले आहेत. आणि आता पुलावरून पाणी गेल्यामुळे इतरही रेलिंग वाहून गेले आहेत. त्यांना आधार देणारे सिमेंटचे काही ठोकळे देखील निसटले आहेत. कमकुवत लोखंडी कठडे, मोठाले खड्डे, क्षमतेपेक्षा अधिक वाहनांची ये–जा, वारंवार पुलावर वाहून येवून साठलेला राडारोडा यामुळे वाहतुकीच्या दृष्टीने हा पुल अत्यंत धोकादायक झाला आहे. खड्ड्यात असंख्य वाहने आदळत आहेत. पादचार्यांना देखील पुलावरून जीवावर उदार होऊन वाट काढावी लागते.

# नारायण सोनवणे यांच्या माध्यमातून शालेय विद्यार्थ्यांना साहित्य वाटप

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरानचे भूमिपुत्र शिक्षक नारायण सोनवणे यांच्या माध्यमातून येथील संत रोहिदास नगर भागातील शालेय विद्यार्थ्यांना शिवसेनेचे शहर प्रमुख चंद्रकांत चौधरी, माजी नगरसेवक प्रकाश सुतार, संदिप शिंदे, पत्रकार मुकुंद रांजाणे, चर्मकार समाजाचे माजी अध्यक्ष नितेश कदम, जेष्ठ सदस्य दिनकर काळे यांच्या हस्ते शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी, शंकर तांबे, हेमंत कारंडे, जगदीश साळुंखे, सतीश साळुंके, दीपक डोईफोडे यांसह नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते. शिक्षक नारायण सोनवणे यांची नेहमीच समाजासाठी धडपड सुरू असते. आपल्या चर्मकार समाजाला विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी ते प्रयत्नशील असतात. विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी बजावली पाहिजे आणि आपल्या गावाचे नाव सातासमुद्रापार गेले पाहिजे हे त्यांचे स्वप्न आहे. त्यांनी आपल्या मनोगतात नमूद केले आहे की, सह्याद्रीच्या रांगेवर निसर्गरम्य माझे गाव माथेरान.श्रावणात वनश्रीने नटलेले देखणे रूप मनाला मोहित करते. अशा लाल मातीत अनेक बंधूंनी येथील संस्कृती जपली आहे. या सर्वांचे वास्तव दर्शन जगाला घडविणारे बालमित्र माथेरान प्रेस क्लबचे माजी अध्यक्ष मुकुंद रांजाणे माजी नगरसेवक प्रकाश सुतार आणि शिवसेना माथेरानचे शहरअध्यक्ष चोधरी यांनी आज बाल तरुण गणेश मंडळ, संत रोहिदास नगरला भेट दिली आणि शाळेतील मुलांना शैक्षणिक साहित्य वाटप करून शुभेच्छा दिल्या.



खऱ्या अर्थी चाळीसीच्या उंबरठ्यावर आलेल्या येथील मंडळाच्या गणपतीची संकल्पना आम्ही बाल मित्रांना सांगितली आणि संदीप सोनवणे, दिलीप सोनवणे, शंकर तांबे, जगदीश साळुंखे, राकेश काळे, सुरेश साळुंखे, रमेश साळुंखे, मनोज साबळे, वसंत बोंबे, सुरेश सोनवणे यांच्या समवेत ती साकारली. अनेक मित्र आणि समाजातील मान्यवर यांनी प्रारंभी पासून या मंडळाला साथ दिली. पर्यावरण पूरक उपक्रम या मंडळातील सर्वच सदस्य राबवितात. मंडळात अनेक मित्रांनी सहभागी व्हावे म्हणजे समाजात किमान समाजातील विद्यार्थ्यांना पूरक साहित्य वाचनाची सवय लावण्यासाठी वाचनालयाची संकल्पना पूर्ण करता येईल. समाजात व्यायाम शाळेसह वाचनालयाची नितांत गरज असल्याची संकल्पना व्यक्त करीत उपस्थित मान्यवर यांचे नारायण सोनवणे यांनी मनःपूर्वक आभार मानले.

# शरद गोळे यांची बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाच्या मान्यतेने शास्त्रीय सल्लागार समितीत नियुक्ती

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ दापोली चे कुलगुरू यांच्या मान्यतेने शास्त्रीय सल्लागार समिती सदस्य म्हणून पाली सुधागड येथील शेतकरी शरद गोळे यांची नियुक्ती पत्र देऊन नियुक्ती करण्यात आले.

शरद गोळे सन २०१८ पासून शेतकरी संघटना व कृषिक्षेत्रात प्रभावीपणे काम करीत आहेत. तालुका कृषिअधिकारी , पंचायत समितीच्या कृषी विभागामार्फत विविध योजना शेतकऱ्यांपर्यत



पोहचविण्याचे काम करीत आहेत. आधुनिक भातशेती, फळशेती, मत्स्यपालन, शेळीपालन, दुग्धव्यवसाय , कुक्कुटपालन इत्यादींचे प्रशिक्षण पूर्ण केले आहे. डॉ बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ दापोली अधिनस्त कृषी विज्ञान केंद्र किल्ला(रोहा)मार्फत दरवर्षी प्रायोगिक तत्वावर बियाणे वाटप करण्यात महत्वाचा पुढाकार ते घेतात. पाली सुधागड तहसीलदार दिलीप रायन्नावार यांच्या संकल्पनेनुसार सुधागड मटकी ब्रॅण्ड करण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. दापोली कृषी विद्यापीठात कृषी सहल आयोजनात सहभाग घेतला. कृषी क्षेत्रातील योगदानाबद्दल त्यांची शास्त्रीय सल्लागार कमिटीवर नियुक्ती करण्यात आली. शरद गोळे यांच्या या निवडीबद्दल विशेषज्ञ डॉ प्रमोद मांडवकर, डॉ नामदेव म्हसकर, डॉ राजेश मांजरेकर, डॉ. मनोज तलाठी, पाली सुधागड तहसीलदार दिलीप रायन्नावार, तालुका कृषी अधिकारी जनाबा झगडे, सरपंच श्रीमती कविता वाळंज, सुधागड कृषी मित्र संघटना सचिव शरद गोळे, डॉ उत्तम महाडकर, जीवन आरेकर, माधुरी भोईर, बशीर परबलकर आदींसह मान्यवर व प्रगतशील शेतकरी यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## साडेतेरा हजार रुपयांची फसवणूक

**दै.रायगड नगरी । कळंबोली**

कळंबोली येथे राहणाऱ्या मेघा उजगरे यांच्या खात्यातून १३ हजार ५०० रुपयांची ऑनलाईन फसवणूक करण्यात आली आहे. या प्रकरणी कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सेक्टर तीन, कळंबोली येथे राहणारे विकास उजगरे ह हे मॅनेजमेंट सिक्युरिटी कंपनी सिक्युरिटी गार्ड म्हणून नोकरी करतात. त्यांचे जळगाव जनता सहकारी बँकेत खाते आहे. हे खाते पती-पत्नी दोघे वापरतात. त्यांच्या मोबाईलवर १३ हजार ५०० रुपये वजा झाल्याचा मेसेज आला. यावेळी त्यांनी बँकेच्या ग्राहक केंद्रावर फोन करून कोणीतरी पैसे काढले असल्याची तक्रार दिली. त्यानुसार कळंबोली पोलीस ठाण्यात अज्ञाता विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

## विद्यमाने मोफत आरोग्य शिबीर संपन्न

**दै.रायगड नगरी । पनवेल**

डायबेटीस हेल्थ फाउंडेशन चॅरिटेबल ट्रस्ट आणि पनवेलवासी समस्त देशस्थ मराठा मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य शिबीराचे आयोजन श्री हनुमान मंदिर, लाईन आळी, शिवाजी रोड येथे शनिवार दि.३ ऑगस्ट रोजी सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत आयोजित करण्यात आले होते.

शिबिरामध्ये मधुमेह होण्याच्या धोक्याची गुणसंख्या (डी.आर.एस), मधुमेह तपासणी (आर.बी.एस), उच्च रक्तदाब तपासणी, उंची, वजन, आणि बी.एम.आय, मधुमेह तज्ञाकडून तपासणी व मार्गदर्शन तसेच फुफ्फुसाची क्षमता यांची मोफत तपासणी करण्यात आली. यावेळी पंचावन्न (५५) नागरिकांनी याचा लाभ घेतला.

यावेळी ट्रस्टी अमित धावडे, डॉ.प्राची पाटील, मुख्य प्रबंधक प्रशांत गायकवाड, प्रबंधक नितीन सरगर, परिचारिका सना शेख, सलमान सुरमे, त्याचप्रमाणे मंदिरातर्फे अध्यक्ष अनिल कुरघोडे, विश्वस्त राजेंद्र आमले, सेवेकरी अशोक पडवळ, शिवा पुजारी आदींचे सहकार्य लाभले.

सर्व प्रकारच्या जाहिरातींचे उत्तम माध्यम
दैनिक रायगड नगरी
9619979706 / 9619737911

**वाचकांना विनम्र सूचना**

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**

# हाळ खुर्द येथील ऊर्दू शाळा मोजतेय अखेरच्या घटका?

## जिल्हा परिषद प्राथमिक ऊर्दू शाळेच्या इमारत दुरूस्तीबाबत उदासीनता?

**दै.रायगड नगरी । खोपोली**

तालुक्यातील हाळ खुर्द ग्रामपंचायतीमधील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक ऊर्दू शाळेची चांगलीच दुरावस्था झाली आहे. शाळेची इमारत जीर्ण झाली आहे. कौल व लाकडी छप्परे (वाशे) कुजले आहेत. जवळच अंगणवाडीचे वर्ग भरत असून वादळी वाऱ्यामुळे, तसेच जीर्ण झालेल्या भिंती पावसामुळे पडून गंभीर दुर्घटना घडण्याचा धोका निर्माण झाला आहे. शिक्षण विभागाने याची दखल घ्यावी, अशी मागणी पालक वर्गांतून केली जात आहे. शाळेत पहिली ते सातवीपर्यंतच्या वर्गांत असून ७६ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्यातील एक विद्यार्थी अपंग असून २१ मुले तर ५५ मुली असून मात्र तीन शिक्षक आहेत.



सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार गेल्या तीन ते चार वर्षांपासून शाळा दुरुस्ती प्रस्ताव पंचायत समिती शिक्षण विभागाकडे देण्यात येत आहे. मात्र, पंचायत समिती व प्रशासनाकडून याची दखल घेण्यात आलेली नाही. शाळेची इमारत खूप जुनी आहे. दरवर्षी खालापूर तालुक्यात शिक्षण अधिकारी हे बदलत आहेत. जिल्हा परिषदेकडे सर्व शिक्षण मोहिमेअंतर्गत कोट्यावधी रुपये पडून असतात. परंतु, अधिकाऱ्यांकडून दुरुस्तीचे प्रस्ताव पाठविण्यात येत नाहीत. ही उर्दू माध्यमाची शाळा असल्यामुळे या शाळेच्या दुरुस्तीकडे दुर्लक्ष होत आहे का? शाळा कोसळून आमच्या पाल्यांच्या जिवाचे नुकसान झाल्यास याचा जबाबदार कोण? मी नाही तो, तो नाही हा असे एकमेकांवर केलेले आरोप ऐकायचे का? जोपर्यंत शाळा दुरुस्त करीत नाही, तोपर्यंत शाळेत मुले पाठविणार नाही, असा निर्णय पालकांनी घेतल्यानंतर शाळा दुरुस्त करणार की कूलूप लावून कायम स्वरूपात बंद ठेवणार? की मोठी दुर्घटना घडल्यावर व कुणाचे बरेवाईट झाल्यावर दुरुस्तीकडे लक्ष देणार का? असा संतप्त सवाल पालक व ग्रामस्थांकडून विचारला जात आहे.

तालुक्यात जिल्हा परिषदेच्या अनेक मराठीसह ऊर्दू प्राथमिक असो की माध्यमिक शाळेची दुरा-वस्था झाल्याचे पाहायला मिळत आहे. मिळालेल्या माहितीनुसार निगरोली गावात देखील एक मराठी शाळा बंद पडली आहे. शाळेच्या झालेल्या दुरावस्थेमुळे पालकांनी आपल्या पाल्यांना इंग्रजी शाळेत वळवले असल्याचे ग्रामस्थांकडून बोलले जात आहे. काही वर्षांपासून इंग्रजी माध्यमाच्या रेट्यामुळे ऊर्दु शाळांमध्ये प्रवेश घेणाऱ्यांची संख्या रोडावली आहे. परंतु ही पडझड जेव्हा सुरू झाली, तेव्हा या प्रश्नाकडे आपण गंभीरपणे पाहिले नाही. आजच्या घडीला तथाकथित पांढरपेशा आणि मध्यमवर्गातील पालक आपल्या मुलांना ऊर्दू माध्यमांच्या शाळांमध्ये घालत नाहीत. याचा परिणाम ऊर्दू माध्यमाच्या शाळांवर होतो आहे. ज्या पालकांचे संपूर्ण आयुष्य ऊर्दू शाळेच्या माध्यमातून घडले तेही आपल्या मुलांना ऊर्दू शाळेत घालायला तयार नाहीत.

जे पालक ऊर्दू शाळेत शिकले, ते आता आपल्या मुलांना इंग्रजी शाळेत का पाठवतात, याचा ही विचार करणे आवश्यक आहे. शहरातील, गावातील ऊर्दू शाळांची अवस्था दयनीय झाली असून, ज्या प्राथमिक सोयी-सुविधा शाळांमध्ये असायला हव्या, त्या शाळांमध्ये दिसून येत नाहीत. शाळांमधील स्वच्छता, शौचालय, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, क्रीडा मैदान अशा सुविधांची स्थिती दयनीय झाली आहे. तसेच ऊर्दू शाळांमध्ये मुलांकडे व्यवस्थित पाहिजे तसे व्यक्तिगत लक्ष दिले जात नाही. म्हणूनच की काय ऊर्दू शाळांमध्ये या सुविधा नसल्यामुळे पालकांनी आपल्या पाल्यांना ऊर्दू शाळांऐवजी खासगी शाळांमध्ये पाठविणे पसंत केले आहे. इंग्रजी शाळेमध्ये मात्र सर्व मुलांकडे व्यक्तिगत लक्ष दिले जाते.

विशेष म्हणजे, आज ज्याप्रमाणे ऊर्दू शाळांच्या त्रुटींबद्दल चर्चा केली जाते तशी चर्चा इंग्रजी शाळांबाबत का केली जात नाही, असा प्रश्न यावेळी उपस्थित होत. ऊर्दू माध्यमांच्या शाळांबाबतचे प्रश्न हा सध्या ऐरणीवरील विषय आहे. मात्र, ही परिस्थिती बदलण्यासाठी ज्या लोकांनी उर्दू शाळेमध्ये शिक्षण घेतले त्यांना पुढे येण्याची गरज आहे. नाही तरी काही दिवसांनी ऊर्दु शाळा होत्या, हे ऊर्दू माध्यमामध्ये शिक्षण घेणाऱ्यांनाच सांगावे लागेल.

## दोन वाहनांमधील अपघातात टेम्पोचालक किरकोळ जखमी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मुंबई-पुणे एक्सप्रेस महामार्गावर शोल्डर लेनवर थांबलेल्या ट्रकवर टेम्पोने धडक देऊन झालेल्या अपघातात टेम्पोचालक किरकोळ जखमी झाल्याची घटना खान्देश्वर परिसरात घडली आहे.

सुरेंद्रकुमार रामप्रसाद (रा. सुलतानपूर ,उत्तर प्रदेश) हे आपल्या ताब्यातील टाटा टेम्पो क्र. MH 04 HY 4628 घेऊन मुंबई बाजूकडे तिसरे लेनने जात असताना झोपेची डुलकी आल्याने त्यांचे पुढे शोल्डर लेनवर थांबलेल्या टाटा ट्रक क्र. MH 11 -L 8900 यास पाठीमागून डाव्या बाजूस जोरात धडक देऊन अपघात झाला आहे.

सदर अपघातात टेम्पोचालकाला छातीला स्टिअरिंग लागून मुका मार बसून किरकोळ दुखापत झाल्याने एमजीएम हॉस्पिटल कामोठे येथे उपचाराकरीता दाखल करण्यात आला आहे. याबाबत खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



## सहायक पोलिस निरिक्षक दिनकर म्हात्रे यांना निरोप

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

सहायक पोलिस निरिक्षक पदावरुन सेवानिवृत्त झालेले दिनकर मधुकर म्हात्रे यांना येथील पोलिस इन्सपेक्टर श्री. भोर यांच्या हस्ते त्यांना निरोप देण्यात आला.

१९८५ मध्ये ते पोलिस सेवेत रुजू झाल्यानंतर रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन, मुरुड आणि त्यानंतर अलिबाग येथे आपली सेवा बजाविली. म्हात्रे यांनी सेवेत असताना त्यांनी विविध क्रीडा स्पर्धांमध्ये सहभाग घेत ॲथेलेटिक्स आणि फुटबॉल स्पर्धेत बक्षिसे पटकाविली होती. दरम्यान, छोटखानी निरोप समारंभाप्रसंगी म्हात्रे यांचे कुटुंब आणि नातेवाईक उपस्थित होते.



### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल १) सौ.सीमा जयंत नरियाणी रा.रो हाऊस नं.२७, साईसदन सी.एच.एस, सेक्टर २ ई, नवी मुंबई, ठाणे ४००७०८. खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमूद असलेल्या मालकांकडून कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षिसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधित व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरु-पात खालील नमूद पत्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमीन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदीव्यवहार पूर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : किकवी, ता.कर्जत, जि.रायगड येथील बिनशेती मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं./ प्लॉट नं. | क्षेत्र आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| १) श्री.विष्णू गेणू जाधव | १४६ | ४३ | ६८६.०० चौ.मी. | ६८.६० |
| २) सौ.स्वाती विष्णू जाधव | १४६ | ४४ | ५६६.०० चौ.मी. | ५६.६० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

**कार्यालयीन पत्ता : मु.गुरुकृपा, जिल्हा परिषद शाळा उक्रुळ शेजारी, पो.चिंचवली, ता.कर्जत, जि.रायगड-४१०२०१**
ईमेल-adv.jayeshmhase@gmail.com

**सही/-**
**ॲड.जयेश संभाजी म्हसे**
**दि.०४/०९/२०२२**
**मो.नं.९०२८९८२२७७**

### जाहीर नोटीस

अर्जदारातर्फे वकील
ॲड.संतोषकुमार भि. सुहासे

पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश साहेब यांचे कोर्टात
दि.कि.अर्ज २००/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.२२/०९/२०२२

१) श्री.वैजंती शामराव पाटील
वय : ६५ वर्षे, व्यवसाय : काही नाही
रा.विसापूर रोड, शिरगाव, अंगणवाडी,
ता.तासगांव, जि.सांगली
मो.नं.९०८२६९५२९०
सध्या रा.फ्लॅट नं.३०५, शांती कुंज को.ऑप.हौ.सोसा.,
प्लॉट नं.१४ डी, खारघर, सेक्टर-४,
ता.पनवेल, जि.रायगड, महाराष्ट्र-४१०२१०
२) सौ.अनिता विजय पाटील
वय : ४५ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.विजय पाटील, शिवाजीनगर, ए/१०,
श्री सिद्धीविनयक को.ऑ.हौ.सोसा., टेंबीपाडा
रोड, भांडूप (प.) मुंबई-४०००७८
सध्या रा.३८२, भाई मनोहर कोतवाल,
प्लॉट नं.बी-१८३फ्रिजन हॉस्पिटल जवळ,
सेक्टर-५, घणसोली-४००७०१
३) सौ.वनिता सुरेश खोसे
वय : ४१ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.फ्लॅट नं.६०४, ए-विंग, सिद्धी हाऊस,
प्लॉट नं.४१६/२, तक्का, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६
सध्या रा.सेक्टर-२१, प्लॉट नं.१४ डी, प्रतिबिंब सोसायटी,
रुम नं.१, खांदा कॉलनी, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६
४) श्री.सोमनाथ शामराव पाटील
वय : ३८ वर्षे, व्यवसाय : खाजगी नोकरी
सध्या रा.फ्लॅट नं.जी-३०५, शांतीकुंज
को.ऑ.हौ.सोसा., प्लॉट नं.१४ डी, खारघर, सेक्टर-४,
ता.पनवेल, जि.रायगड, महाराष्ट्र-४१०२१० अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही सामनेवाला

१) तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, अर्जदार क्र.१ ते ४ हे वर नमूद पत्यावरती कायमपणे राहण्यास आहे. सदर कामातील अर्जदार क्र.१ यांचे पती व अर्जदार क्र.२ ते ४ यांचे वडील कै.शामराव सखाराम पाटील हे दि.१७/०३/२०२० रोजी जाधव हॉस्पिटल, भारती विद्यामंदिर जवळ, तासगांव, जि.सांगली येथे मयत झालेले आहेत.

२) मिळकतीचे वर्णन :- कै.शामराव सखाराम पाटील यांची एन.एम.एम.सी. सिडको, प्लॉट नं.१४ डी, सेक्टर-४, शांतीकुंज को.ऑप.हौ.सोसा. मध्ये ३६०.३६ स्क्वेअर फुट एवढी फ्लॅट मिळकत होती व आहे. सदरची मिळकत ही सिडको नवी मुंबई, खारघर यांच्या अधिकार क्षेत्रात आहे. त्याचे मुळ ऑफिस बेलापूर, सखाराम पाटील मार्ग, सेक्टर-१०, सीबीडी, बेलापूर-४००६१४ येथे आहे. अर्जदार क्र.१ ते ४ यांना सदरचा वारसदाखला बेलापूर येथील मुळ कार्यालयामध्ये वारसांची नोंदीकामी आवश्यक आहे.

**कै.शामराव सखाराम पाटील यांस वारसदार पुढीलप्रमाणे :-**

**१) कै.वैजंती शामराव पाटील पत्नी**
**२) सौ.अनिता विजय पाटील मुलगी**
**३) सौ.वनिता सुरेश खोसे मुलगी**
**४) श्री.सोमनाथ शामराव पाटील मुलगा**

वरील कै.शामराव सखाराम पाटील यांचे कायदेशीर वारस असल्याचा वारसदाखला मिळविण्यासाठी अर्जदार क्र.१ ते ४ यांनी नामदार कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे. तरी सदर वारस दाखल्याच्या कामी कोणाच्याही कसल्याही हरकती असल्यास सदरच्या हरकती ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत मे.कोर्टात दाखल कराव्यात. मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही. अर्जदार यांचे लाभांत वारस दाखला दिला जाईल याची नोंद घ्यावी.

आज दि. सहीने व कोर्टाने शिक्काने नोटीस दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.क.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.क.स्तर, पनवेल**

## व्यसनापासून दूर जात असलेल्या ४० जणांनी केले रक्तदान



**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

स्वतः व्यसनापासून दूर गेलेला पालीतील देऊळवाडा येथील अंकुश आपटे हा तरुण आयुष्य व्यसनमुक्ती केंद्र चालवित आहे. त्याने नुकतेच आपल्या केंद्रात रक्तदान शिबिर आयोजित केले होते. हे रक्तदान शिबिर अख्ख्या महाराष्ट्रात आगळवेगळे ठरले. कारण येथील व्यसनापासून दूर जात असलेल्या तब्बल ४० रुग्णांनी रक्तदान केले. अशी माहिती अंकुश आपटे यांनी दिली.

या केंद्रात उपचार घेत असलेले रुग्ण आता व्यसनापासून लांब आहेत. यातील बेरेच रुग्ण म्हणाले की पूर्वी आम्ही रक्तदानाला जायचो, पण तेव्हा दारू पिऊन जात असू किंवा आदल्या दिवशीची उतरलेली नसे. अशावेळी तिथे आमचे रक्त घ्यायचे नाहीत. पण आता आम्ही दारू पीत नाही, आमच्याही शरीरात रक्तच आहे. आणि ते आम्हाला गरजूंना दान करायचे आहे. म्हणूनच मग पुण्यातील आयुष्य व्यसनमुक्ती केंद्रात रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले. आणि येथे व्यसनापासून लांब गेलेल्या तब्बल ४० जणांनी रक्तदान केले आहे. असे अंकुश आपटे यांनी सकाळला सांगितले. या रक्तदान शिबिरासाठी अभिज्ञा आपटे, विकी थोरात व विवेक मुळे आदींनी मेहनत घेतली.

## पोकलेन मशीनसह ब्रेकरमशिनची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पोकलेन मशीनसह ब्रेकर मशीनची चोरी तसेच दोन महिन्याचे पोकलेनचे भाडे असे मिळून एकूण १२ लाख ७० हजार रुपयांचंही फसवणूक झाल्याची घटना पनवेल परिसरात घडली आहे.

सतीश शिंदे यांच्या मालकीची पोकलेन मशीन हि तिघा जणांना भाड्याने लावण्यासाठी दिली होती. परंतु सदर त्रिकुटाने आपसात संगनमत करून ज्या साईटवर कामासाठी लावतो असे सांगून ते शिंदे यांना काही एक न सांगता परस्पर दुसऱ्या साईटवर त्या मशीनचा वापर करून सदर मशीन परस्पर कोणाला तरी विक्री करून त्याचप्रमाणे ठरल्याप्रमाणे भाडे न देता एकूण १२ लाख ७० हजार रुपयांची फसवणूक झाल्याचे त्यांच्या लक्षात येताच याबाबत त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

## सौंदर्य प्रसाधने वापरताना शरीर शुद्धी फार महत्वाची : डॉ. ज्योती सातपुते

**दै.रायगड नगरी । कर्जत**

'महिला सौंदर्य टिकविण्यासाठी त्या महिला वरवरच्या क्रीम वापरून रिझल्टची अपेक्षा करतात. खरे तर त्यांनी शरीरातील काय दोष आहेत? ते जाणून घेणे आवश्यक आहे. आपल्या चेहऱ्याचे कपाळापासून काही भाग केले आहेत. त्याला फेस मॅपिंग म्हणतात. ते केल्या नंतर आपल्याला दोष कळतात. डोळ्यांखाली काळी वर्तुळे येऊ लागली की तो पाण्याचा प्रॉब्लेम समजावा तो किडणीशी संबंधित आहे. सौंदर्य प्रसाधने वापरताना शरीर शुद्धी फार महत्वाची आहे.' असा सल्ला ज्योविस आयुर्वेदच्या डॉ. ज्योती सातपुते यांनी महिलांना दिला.

माजी आमदार तुकाराम सुर्वे प्रतिष्ठानच्या वतीने आमराई येथील आशीर्वादच्या सभागृहात 'महिलांसाठी सौंदर्या विषयीच्या समस्यांसाठी मोफत आयुर्वेदिक प्रशिक्षण शिबिराचे आयोजन केले होते. स्व. तुकाराम सुर्वे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून दीप प्रज्वलनाने समारंभाची सुरुवात करण्यात आली. या प्रसंगी प्रतिष्ठानचे अध्यक्ष मुकेश सुर्वे, सचिव मनीषा सुर्वे, माजी नगराध्यक्ष वनिता म्हसे, लेखिका मृदुला गडणीस, मनोज सुर्वे आदी व्यासपीठावर उपस्थित होते. सुर्वे यांनी उपस्थितांचे स्वागत केले व प्रास्ताविकात स्व. तुकाराम सुर्वे यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी आम्ही कार्यरत असून ग्रामीण भागात आयुर्वेदाचा प्रसार व्हावा यासाठी प्रयत्नशील आहोत.' असे स्पष्ट केले.

डॉ. सातपुते यांनी महिलांना सौंदर्या बाबत टिप्स देताना, 'पाणी कमी पिणे, झोप कमी होणे, मानसिक तणाव हे सुद्धा शरीरात दोष येतात. यामध्ये त्वचा फार महत्वाची आहे. त्वचेवर पुळ्या येणे किंवा लव येणे ही ती लक्षणे आहेत. त्यामुळे आधी शरीराची तपासणी करून घ्यावी आणि नंतर उपचार करावेत. अन्यथा चेहरे विद्रुप होऊ शकतात.' असे स्पष्ट केले. मृदुला गडणीस यांनीही आपले विचार व्यक्त केले. आभार प्रदर्शन मनीषा सुर्वे यांनी केले. याप्रसंगी प्रिया गडकरी, ज्योती पाटील, पद्मजा देशमुख, सुजाता सावंत, साक्षी वाडेकर, शीतल ठोंबरे, बिनीता घुमरे, सुप्रिया देशमुख, वत्सला वांजळे, स्नेहा शिंदे, रोहिणी सुर्वे, धनश्री ढवळे, पूजा वाघमोडे , रेखा हागवणे, कल्पना ठोंबरे आदी उपस्थित होते.



### जाहीर नोटीस

पाली येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो.यांचे कोर्टात
फौ.चौ.अर्ज क्र.४९/२०२२
ने.ता.३०/०९/२०२२

सौ.भावना प्रदीप वाघ
वय : ३८ वर्षे, धंदा : शेती
रा.कामगार वसाहत, नर्सरी बाग, जी.जी.
कॉलेजसमोर, वसई गाव, बसीन ठाणे ४०१२०१ अर्जदार

विरुद्ध

ग्रामसेवक / ग्रामविकास अधिकारी
ग्रुप ग्रामपंचायत खांडपोली,
ता.सुधागड, जि.रायगड सामनेवाला

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी अर्जदार याचे आजोबा बंडू लक्ष्मण परब हे दि.२५/१०/१९९२ रोजी मौजे : खांडपोली, ता.सुधागड, जि.रायगड येथे मरण पावले आहेत. परंतु मयत बंडू लक्ष्मण परब यांच्या मृत्यूनंतर अर्जदार यांचे घरातील व्यक्तींकडून अज्ञानामुळे / अनावधानाने एक वर्षाच्या आत शासन दप्तरी त्याचे मृत्यूची नोंद करणेचे राहून गेले आहे. सबब अर्जदार यांनी सदरील अर्ज मयत बंडू लक्ष्मण परब यांच्या मृत्यूची नोंदणी करण्याचे आदेश होण्याकरिता या मे.कोर्टात दाखल केलेला आहे. सदर अर्जदार यास त्याचे मागणीप्रमाणे मयत बंडू लक्ष्मण परब यांच्या मृत्यूची नोंद होण्याकरिता कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमांनी त्यांच्या लेखी हरकती जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारास त्याचे विनंतीप्रमाणे मे.कोर्ट योग्य ते आदेश करतील याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.३० माहे ०८ सन २०२२ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे शिक्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**प्रथमवर्ग न्याय.सुधागड**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**प्रथमवर्ग न्याय.सुधागड**



सिडकोचे मुख्य अग्निशमन अधिकारी राणे कुटुंबियांच्या मुंबई येथील निवासस्थानी गणरायाची सुबक मुर्ती




बांधकाम व्यावसायिक विश्वास कारेकर, सुभाष कारेकर, रोहन देशमुख यांच्या निवास स्थानातील श्री गणेशाची सुबक मुर्ती



पनवेल शिवकर येथील सुरेश पोळ यांच्या निवासस्थानी विराजमान झालेले श्री गणराज



श्रीवर्धन येथील निखिल भुसाणे यांचे निवासस्थानी विराजमान श्री गणराज




म्हसळा नाभिक समाज अध्यक्ष प्रदिप कदम यांचे निवास्थानी विराजमान श्रीणराज आकर्षक देखाव्यासह



श्रीवर्धन येथील निवृत्त परिमंडळ वनाधिकारी बाळकृष्ण गोरनाक यांचे निवासस्थानी विराजमान श्री गणराज



वाडंबा येथील समाजसेवक शैलेश गोपाळ काते यांचे निवासस्थसानी विराजमान श्री गणराज



जसखार येथील साई भक्त हरेश हिराजी घरत यांच्या घरातील गणेशाची आकर्षक मूर्ती व सजावट



दिघोडे येथील गंगाराम गजानन पाटील यांच्या घरातील गणेशाची आकर्षक मूर्ती व सजावट




मंदा किशोर कर्वे आणि कर्वे परिवार मुंबई प्रभादेवी (खाडा ) येथील गणेशाची सुबक मूर्ती व आकर्षक सजावट सजावट दिप्ती किशोर कर्वे



मा.नगरसेवक राजू सोनी यांच्या निवासस्थानी स्थानापन्न झालेल्या गणरायाचे दर्शन घेताना मा.पोलीस आयुक्त सुनील बाजारे



मा.नगरसेविका निता माळी यांच्या निवासस्थानी स्थानापन्न झालेल्या गणरायाचे दर्शन घेताना सहाय्यक पोलीस आयुक्त भागवत सोनावणे



नवघर येथील शास्त्रीय गायक संगीतकार पंडित गणेश बंडा यांच्या घरातील गणेशाची आकर्षक मूर्ती व सजावट



सुकापुर येथील ग्रामपंचायत सदस्य चंद्रकांत पोपटा यांच्या घरातील बाप्पाचे दर्शन घेताना शेकाप नेते काशिनाथ पाटील, तालुका चिटणीस राजेश केणी, मा.उपसरपंच किशोर पाटील, मा. ग्रामपंचायत सदस्य पंढरीनाथ म्हस्कर

# चिंचपाडा गावातील विजय केणी यांनी साकारला नवी मुंबई विमानतळाचा देखावा

## नवी मुंबई विमानतळाला दि.बा पाटलांचं नाव

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ नामकरण मुद्दा रायगड आणि ठाणे जिल्ह्यात चांगलाच गाजत आहे. गणेशोत्सवात सुध्दा भक्तांनी आपल्या डेकोरेशनच्या माध्यमातून नामकरण प्रश्न लावून धरला आहे. चिंचपाडा गावातील सामाजिक कार्यकर्ते स्वर्गीय विठ्ठल चाहू केणी यांच्या घरी त्यांचा पुतण्या विजय कान्हा केणी यांनी तर ग्रामस्थ व केपी ग्रुपच्या सहकार्याने हा देखावा सकारला आहे. हा देखावा पाहिला तर प्रकल्पग्रस्त भूमिपुत्र आपल्या भूमिकेवर आजही ठाम आहेत हे सिद्ध होते.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव द्यावे यासाठी प्रकल्पग्रस्त ठाम असल्याचे आजही पाहायला मिळत आहे. सध्या गणेशोत्सव सुरू झालेला आहे. दरम्यान गणपती बापाची सजावट म्हणून आंतरराष्ट्रीय विमानतळाचे देखावे बनवण्यात आलेले आहेत. चिंचपाडा गाव–तील येथील गोरगरिबांच्या हाकेला धावणारे, नेहमी सामाजिक क्षेत्रात अग्रेसर राहणारे वडघर ग्रामपंचायतीचे माजी सदस्य स्वर्गीय विठ्ठल कान्हा केणी यांनी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळला दी.बा.पाटील यांचे नाव देण्यासाठी चिंचपाडा गावातील ग्रामस्थासह आंदोलनात सहभागी झाले होते. त्यांच्याच पावलावर पाऊल ठेवत युवा कार्यकर्ते त्यांचा पुतण्या विजय कान्हा केणी हे देखील प्रत्येक आंदोलनात सहभागी होत आहेत. सध्या गणेशोत्सव सुरु असून विजय कान्हा केणी यांनी चिंचपाडा गावातील ग्रामस्थ व केपी ग्रुप यांच्या सहकार्याने विजय यांनी देखील घरगुती गणेशाची आरास दि.बा.पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचा फलक असलेला देखावा साकारलेला आहे. विमानतळ ज्या ठिकाणी उभारले जाणार आहे, त्या ठिकाणचे हुबेहूब चित्र आपल्याला पाहायला मिळते.



देखावा पाहिला तर प्रकल्पग्रस्त भूमिपुत्र आपल्या भूमिकेवर आजही ठाम आहे हे सिद्ध होते.

विजय केणी यांच्याशी संपर्क साधला असता ते म्हणाले की, गणपती बाप्पा विघ्नहर्ता, बुध्दीचा देवता आहे. आणि बाप्पाने या महाराष्ट्रामधील सरकारला सदबुध्दी दिली आणि नवी मुंबई विमानतळाला नाव दि. बा. पाटील हेच दिले आहे. त्याचबरोबर सरकारने दी.बा पाटील यांच्या नावाची घोषणा करून मंत्रीमंडळात मंजूर केला आहे. तसेच हा प्रस्ताव लवकरात लवकर केंद्राकडे पाठवून तोही मंजूर होईल, हाच देखावा साकारण्याचा मुख्य उद्देश आहे. पुढे ते म्हणतात, नवी मुंबईतला आगरी समाज जमिनी जाऊनही आपल्या भूमीवर राहताना दिसतोय, ते केवळ दि. बा. पाटील या नेत्यामुळे आहे. विकसित भूखंडाची योजना दिबांनी त्यावेळी सरकारला मानायला लावली नसती, तर आज इथला प्रकल्पग्रस्त दूर कुठेतरी फेकला गेला असता. इथल्या लोकांमध्ये दिबांबद्दल असलेला जिव्हाळा यातून निर्माण झालाय. आपल्या भाकरीवर दिबांचं नाव असल्याची जाणीव असल्यानं विमानातळाला त्यांच्या नावाचा होत असलेला आग्रह दिसून येतो.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी चिंचपाडा गावातील प्रकल्पग्रस्तानी या प्रकल्पासाठी आपल्या जमिनी सिडकोला दिल्या. तसेच सिडकोने येथीलच प्रकल्पग्रस्ताना विकसित भूखंड देण्यात आले आहे. याठिकाणी विकसित झालेल्या ठिकाणी नव्याने झालेल्या इमारती, शाळा, बसस्थानक तसेच कालभैरव मंदिर, वरमाता मंदिर याची प्रतिकृती उभारली आहे. त्यामुळे केणी यांच्या घरी प्रतक्ष्यात चिंचपाडा गावाच पाहायला मिळत आहे.

विमानतळच्या आंदोलनात चिंचपाडा गावातील ग्रामस्थ अग्रस्थानी होते. प्रत्येक आंदोलनामध्ये घरातील नागरिक, महिला, मुलांसकट सहभागी झाले होते. आपल्या दी.बा च नाव विमानतळला लागला पाहिजे यामध्ये दहा गावाप्रमाणेच चिंचपाडा गावातील प्रकल्पग्रस्त अग्रस्थानी होते. यावेळी विजय केणी यांनी गणेशोत्सवनिमित्ताने साकारलेल्या देखव्यासाठी चिंचपाडा ग्रामस्थ व केपी ग्रुप यांचे विशेष सहकार्य लाभले असल्याचे विजय केणी यांनी सांगितले.